Selected

विजयादशमीनिमित्त येवल्यात पथसंचलन, शस्त्रपूजन; नागरिकांकडून पुष्पवृष्टीने स्वागत



येवला : राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, येवला शाखेच्या वतीने विजयादशमी उत्सव व संघाच्या स्थापना दिनानिमित्त भव्य सघोष, सदंड पथसंचलन आणि पारंपरिक शस्त्रपूजन सोहळा उत्साहात पार पडला. स्थानिक टिळक मैदानावरील मुरलीधर मंदिर परिसरात मुख्य कार्यक्रम संपन्न झाला. शहरातील प्रमुख मार्गांवरून स्वयंसेवकांचे शिस्तबद्ध व सघोष पथसंचलन काढण्यात आले. या संचलनात अबाल वृद्ध स्वयंसेवक पूर्ण गणवेशात आणि हाती दंड घेऊन सहभागी झाले होते. संचलन मार्गावर नागरिकांनी घरांसमोर आकर्षक सडा-रांगोळ्या काढल्या होत्या, तर ठिकठिकाणी स्वयंसेवकांवर पुष्पवृष्टी करून शहरवासीयांनी जल्लोषात स्वागत केले. संचलनानंतर सकाळी ८ ते ९ या वेळेत पारंपरिक शस्त्रपूजन व मुख्य बौद्धिक कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून पश्चिम महाराष्ट्र प्रांत सहप्रचारक केदार कुलकर्णी उपस्थित होते. त्यांनी राष्ट्रभक्ती, सामाजिक एकता आणि स्वयंसेवकांची समाजकार्यातील भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून साई श्रीऑक्सिडेंटल ॲण्ड मॅटर्निटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. विजय मोरे उपस्थित होते. या सोहळ्यास माजी तालुका संघचालक दिनेशभाई मुंदडा यांच्यासह संघाचे विविध पदाधिकारी, स्वयंसेवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पशुसंवर्धन विभागातील पदभरतीच्या बनावट जाहिरातींपासून सावध रहावे

नाशिक : नाशिक जिल्ह्यात पशुसंवर्धन विभागातील विविध पदांच्या भरतीबाबत समाजमाध्यमांवर प्रसारित होत असलेल्या जाहिराती बनावट व अनधिकृत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुषंगाने समाजमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या पदभरतीच्या जाहिरातींमुळे बेरोजगार तरुणांची फसवणूक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे उमेदवारांनी कोणत्याही अनधिकृत जाहिरातीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे जिल्हा उपआयुक्त डॉ. सदाशिव बेडक्याळे यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकान्वये केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या शासन निर्णयानुसार पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाची पुनर्रचना आणि सुधारित आकृतिबंधास मान्यता देण्यात आली आहे. या सुधारित आकृतिबंधानुसार काही पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात येणार आहेत. या पदभरतीसंदर्भात शासनस्तरावर प्रक्रिया सुरू असली, तरी शासनाने अथवा पशुसंवर्धन विभागाने अद्याप अधिकृत भरतीची जाहिरात प्रसिद्ध केलेली नाही. समाजमाध्यमांद्वारे प्रसारित झालेले पदभरतीचे पत्रक बोगस व अनधिकृत आहे. शासनाची पदभरती शासनाने दिलेल्या पोर्टलवरच होते. त्यामुळे सध्या जिल्ह्यात पशुसंवर्धन विभागातील पदभरतीच्या बोगस जाहितीस बळी पडू नये, असेही आवाहन पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे जिल्हा उपआयुक्त डॉ. बेडक्याळे यांनी केले आहे.

दर नियंत्रण योजनेचा फज्जा, कांद्याला ७० रुपये किलोचाच भाव

शेतकऱ्यांमध्ये संमिश्र प्रतिक्रिया : दावा- १.२१ लाख टन बफर स्टॉक

नाशिक । प्रतिनिधी ।

देशभरात कांद्याचे भाव नियंत्रित करण्यासाठी केंद्र सरकारने नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून 'कांदा एक्स्प्रेस'चा गाजावाजा केला. मात्र, इन्व्हेस्टिगेशनमध्ये या संपूर्ण यंत्रणेचे पितळ उघडे पडले आहे. यंदा तब्बल १ लाख २१ हजार टन कांद्याचा बफर स्टॉक आहे.

दिल्ली, पंजाब, कोलकाता, चेन्नई, पाटणा आणि गुवाहाटी या प्रमुख बाजारपेठांमध्ये कांदा पाठवून दरावर नियंत्रण मिळवल्याचा आव शासनाकडून आणला जात आहे. ६००० रुपयांवरून घाऊक भाव ३,५०० रुपये प्रतिक्विंटलवर आल्याचा दावा मंत्रालयाकडून केला जात आहे; परंतु प्रत्यक्षात किरकोळ बाजारात सर्वसामान्यांना ३५ रुपये किलोचा सवलतीचा कांदा मिळतच नाहीये. उलट नाफेडच्या ढिसाळ कारभारामुळे शेतकऱ्यांच्या हाती कवडीमोल दर आणि ग्राहकांच्या खिशाला मात्र ७० रुपये किलो दरामुळे कात्री लागत आहे.



दिशाभूल करणाऱ्या आकडेवारीमुळे बाजारभाव कमी

नाफेड आणि एनसीसीएफच्या या 'रिटेल इंटरव्हेन्शन'चा थेट फटका नाशिकच्या स्थानिक बाजारपेठांना बसत आहे. सरकारी संस्थांच्या या दिशाभूल करणाऱ्या आकडेवारीने बाजारातील भाव कमी केले आहेत. 'प्राइस स्टॅबिलायझेशन फंड'च्या नावाखाली शेतकऱ्यांचा कांदा कवडीमोल दराने खरेदी करून बाजारात पाठवण्याचे नियोजन न करता केवळ कागदी आकडेवारी दाखवून स्वतःची पाठ थोपटून घ्यायची, असा हा प्रकार आहे.

परिणाम : फक्त १२ रेक कांदा परराज्यात रवाना

एका रेल्वे रेकमधून तब्बल ८०० टन कांदा पाठवला जातो. नाफेड आणि एनसीसीएफकडून सुरुवातीला लासलगाव रेल्वे स्थानकातून दोन रेक, तर उर्वरित दहा रेक मनमाड येथून (१५, १८, २१, २९ सप्टेंबर आणि २, ५, ८, १३, १४ ऑक्टोबर रोजी) पाठवण्यात आले. या १२ रेकद्वारे केवळ ९ हजार ६०० मेट्रिक टन कांदाच परराज्यात रवाना झाला आहे.

कारण : अयोग्य खरेदीमुळे सर्व बफर स्टॉकच खराब

केंद्रीय ग्राहक संरक्षण मंत्रालयाच्या निर्देशांनुसार ४४० टन कांदा घेऊन रेल्वे आगरतळाकडे रवाना झाली. मात्र, १ लाख २१ हजार टनांच्या बफर स्टॉकच्या दाव्याच्या तुलनेत ईशान्य भारतात आतापर्यंत दोन रेक आणि ४४ ट्रक्सद्वारे अवघा २ हजार ८०० टन कांदा पाठवण्यात आला आहे. उर्वरित १ लाख०८हजार६०० टन कांदा गोदामांमध्ये सडल्याचे स्पष्ट होत आहे.

संत कबीरनगर वस्ती अधिकृत करावी

झोपडपट्टी न्याय मंचची आयुक्तांकडे मागणी



नाशिक । प्रतिनिधी।

शहरातील संत कबीरनगरमधील रहिवाशांची घरे वाचवून संपूर्ण वस्ती अधिकृत करावी, तसेच विकास आराखडा (डीपी) आणि रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली होणारी निष्कासनाची कार्यवाही तातडीने स्थगित करावी, अशी मागणी झोपडपट्टी न्याय मंचच्या शिष्टमंडळाने महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी आयुक्तांनी या प्रश्नावर सकारात्मक भूमिका घेतल्याची माहिती शिष्टमंडळाने दिली.

महापालिकेकडून विकास आराखडा आणि रस्ता रुंदीकरणाच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया राबवून रहिवाशांच्या घरांवर निष्कासनाची कारवाई करण्याची तयारी सुरू असल्याबद्दल शिष्टमंडळाने नाराजी व्यक्त केली. संत कबीरनगरमध्ये अनेक कुटुंबे पिढ्यानपिढ्या वास्तव्यास आहेत. अनेकांकडे घरपट्टी पावत्या, आधार कार्ड, रेशन कार्ड आणि इतर अधिकृत कागदपत्रे आहेत. काही कुटुंबांना रमाई आवास योजनेसह विविध घरकुल योजनांचा लाभ मिळाला आहे. रहिवासी महापालिकेच्या पाणी व इतर नागरी सुविधांचा लाभ घेत असून नियमित करही भरत आहेत. अशा परिस्थितीत रहिवाशांचे म्हणणे न ऐकता घरे पाडण्याची कारवाई झाल्यास हजारो गरीब कुटुंबे बेघर होतील, अशी भीती शिष्टमंडळाने व्यक्त केली.

या शिष्टमंडळात भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सहसचिव राजू देसले, मनोहर पगारे, ॲड. गणेश दहेज, समाधान शिलावट, विजय साहे, संदीप कदम, युवराज मनेरे यांचा समावेश होता. यावेळी उपमहापौर विलास शिंदे आणि गटनेते अजय बोरस्ते, निवृत्ती इंगोले यांनीही संत कबीरनगर प्रश्नी आयुक्तांशी चर्चा केली. या शिष्टमंडळात भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सहसचिव राजू देसले, मनोहर पगारे, ॲड. गणेश दहेज, समाधान शिलावट, विजय साहे, संदीप कदम, युवराज मनेरे यांचा समावेश होता. यावेळी उपमहापौर विलास शिंदे आणि गटनेते अजय बोरस्ते, निवृत्ती इंगोले यांनीही संत कबीरनगर प्रश्नी आयुक्तांशी चर्चा केली.

अघोरी पूजेच्या नावाखाली महिलेस ७.५० लाखांचा गंडा ; भोंदूविरोधात गुन्हा

नाशिक । प्रतिनिधी।

आजार बरा करण्याच्या आणि घरात पैशांचा पाऊस पाडण्याच्या आमिषाने पनवेलच्या ३५ वर्षीय विवाहितेची तब्बल ७ लाख ५० हजार रुपयांनी फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात भोंदू अरुण धोंडू पाटील याच्याविरुद्ध जादूटोणाविरोधी कायदा, फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून संशयित फरार झाला आहे.

काय आहे प्रकरण ?

पनवेल येथील पीडित महिला अस्थमाच्या आजाराने त्रस्त होती. आजार बरा करण्यासाठी तिने फेब्रुवारी २०२२ मध्ये पतीसह नाशिकमधील भोंदू अरुण पाटीलची भेट घेतली. "मला कालभैरवाची अघोरी विद्या अवगत आहे, मी आजार पूर्ण बरा करतो आणि पैशांचा पाऊसही पाडतो," असा दावा त्याने केला.

त्यानंतर ५० हजार रुपये घेऊन मध्यरात्री १२ वाजता गोदावरी धबधब्याजवळ पीडितेवर अघोरी पूजा करण्यात आली. त्यासाठी तिला पारदर्शक साडी नेसवण्यात आल्याचा आरोपही तक्रारीत आहे. आजार बरा न झाल्याने पुन्हा पूजा करण्याच्या नावाखाली दोन लाख रुपये उकळले. नंतर पैशांचा पाऊस पाडण्याच्या बहाण्याने आणखी पाच लाख रुपये घेतले. मात्र, ना आजार बरा झाला ना पैशांचा पाऊस पडला, त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे महिलेच्या लक्षात आले.



अंधश्रद्धा निर्मूलन समितीची मदत पीडितेने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या मदतीने गंगापूर पोलिसांत तक्रार दाखल केली. पोलिसांनी भोंदूविरोधात गुन्हा दाखल केला असून तो पसार झाला आहे. अघोरी प्रकार तक्रारीनुसार या विधीदरम्यान मानवी कवट्या, हळद-कुंकू लावलेला जिवंत बोकड आणि रक्ताने माखलेल्या कपड्यांचा वापर करण्यात आल्याचे म्हटले आहे. पोलीस संशयिताचा शोध घेत आहेत.

दसऱ्याच्या दिवशी खाकी वर्दीत माणुसकीचे दर्शन!

पोलीस उपनिरीक्षक स्नेहल खडांगळे यांच्या तत्परतेमुळे सात वर्षीय शिवनंदनला पुन्हा मिळाली आई-वडिलांची माया

येवला । प्रतिनिधी।

दि. २० रोजी विजयादशमीच्या दिवशी सप्तशृंगी गडावर भाविकांची मोठी गर्दी होती. दुपारी सुमारे एक वाजेच्या सुमारास मंदिराकडे जाणाऱ्या तलावाजवळ सात वर्षीय बालक एकटाच रडत असल्याचे काही भाविकांच्या निदर्शनास आले. बालक गर्दीत हरवल्याचे लक्षात येताच त्यांनी क्षणाचाही विलंब न करता त्याला मंदिराच्या पायऱ्यांजवळील पोलीस आऊट पोस्टवर नेले.

तेथे कर्तव्यावर असलेल्या आणि सध्या येवला तालुका पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस उपनिरीक्षक स्नेहल खडांगळे यांनी बालकाला विश्वासात घेत त्याच्याशी संवाद साधण्यास सुरुवात केली.

बालकाला नीट बोलता येत नसल्यामुळे त्याच्याकडून संपूर्ण माहिती मिळविणे सोपे नव्हते. मात्र, खडांगळे यांनी संयमाने त्याची विचारपूस केली. बालकाच्या बोलण्यातून तो येवला तालुक्यातील ठाणगाव येथील असून, त्याच्या वडिलांचे नाव त्र्यंबक खुरसणे असल्याचे समजले.

मिळालेल्या या धाग्याच्या आधारे त्यांनी तत्काळ पाटोदा, येथील पोलीस पाटील मुजम्मिल चौधरी यांच्याशी संपर्क साधला. चौधरी यांनीही तातडीने ठाणगाव परिसरात चौकशी केली. संबंधित कुटुंबीय सप्तशृंगी गडावर दर्शनासाठी गेल्याची माहिती मिळताच त्यांना शोधण्याचे प्रयत्न वेगाने सुरू झाले.



मोबाईल क्रमांकाच्या मदतीने जुळले माय-लेकराचे नाते

बालकाचे आई-वडील आणि त्यांच्यासोबत आलेल्या व्यक्तींकडे मोबाईल फोन नसल्याने संपर्क साधण्यात अडचणी येत होत्या. मात्र, कुटुंबीयांसोबत आलेल्या किरण साळवे यांचा मोबाईल क्रमांक मिळविण्यात यश आले. त्यांच्याशी तातडीने संपर्क साधण्यात आला आणि काही वेळातच बालकाचे आई-वडील पोलीस आऊट पोस्टवर पोहोचले. अखेर आवश्यक खात्री केल्यानंतर सात वर्षीय शिवनंदन आपल्या आई-वडिलांच्या कुशीत विसावला. काही वेळापूर्वी चिंतेने व्याकूळ झालेल्या आई-वडिलांच्या चेहऱ्यावर मुलाला पुन्हा पाहताच आनंद फुलला. हरवलेला चिमुकला सुखरूप मिळाल्याने कुटुंबीयांनी सुटकेचा निःश्वास सोडला. त्यांनी पोलीस उपनिरीक्षक स्नेहल खडांगळे, पोलीस पाटील चौधरी आणि सहकाऱ्यांचे मनापासून आभार मानले.

या संपूर्ण प्रक्रियेत सुमारे दोन ते तीन तास गेले. मात्र, एका चिमुकल्याला त्याच्या आई-वडिलांपर्यंत सुखरूप पोहोचविण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक स्नेहल खडांगळे आणि पोलीस पाटील चौधरी यांनीतहानभूक विसरून प्रयत्न केले. सणाच्या दिवशी कर्तव्य बजावताना दाखविलेली ही संवेदनशीलता आणि समन्वय उपस्थितांसाठी

७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त त्रिरश्मी बुद्ध लेणी परिसर धम्ममय

भीम-बुद्ध गीतांतून प्रबोधन; श्रामणेर शिबिराचा समारोप

नाशिक । प्रतिनिधी।

७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नाशिक येथील ऐतिहासिक त्रिरश्मी बुद्ध लेणी परिसरात मंगळवारी (दि. २० ऑक्टोबर) धम्ममय वातावरण निर्माण झाले होते. भारतीय बौद्ध महासभा, नाशिक शहर यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमाला धम्म अनुयायांचा मोठा प्रतिसाद लाभला.

या निमित्ताने विविध सामाजिक संस्था आणि मंडळांच्या वतीने भीम-बुद्ध गीतांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गीतांच्या माध्यमातून भगवान गौतम बुद्धांचे विचार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समतावादी विचार जनमानसापर्यंत पोहोचविण्याचा



प्रयत्न करण्यात आला. धम्म अनुयायांच्या मोठ्या उपस्थितीमुळे संपूर्ण त्रिरश्मी बुद्ध लेणी परिसर बुद्धमय आणि धम्ममय झाला होता.

याच कार्यक्रमात भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने आयोजित श्रामणेर शिबिराचा सांगता व समारोप सोहळाही उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान चवदास भालेराव यांनी भूषविले.

यावेळी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते मनोहर अहिरे, कल्याणी अहिरे, संबोधी दूर्सचे सनी जगताप, प्रेम बिऱ्हाडे, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष मिहीर गजबे, वंचित बहुजन आघाडीचे शहर उपाध्यक्ष ताराचंद मोतमल, समता सैनिक दलाचे प्रल्हाद उघडे, डीआरसी एक उम्मीद संस्थेच्या अध्यक्ष पुष्पा वावळे, समता बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या प्रा. कविता भालेराव, स्वराज नंद, युवराज नंद, अनिल भालेराव, समाधान चव्हाण, बाळा वावळे आदी मान्यवर उपस्थित होते.

बाळासाहेब सोनवणे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान

ब्रह्माकुमारी परिवारासह महंत डॉ. भक्तीचरणदास महाराज यांचे आशीर्वाद

नाशिक। प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी अधिकारी संघटनेचे राज्याध्यक्ष तथा महिरावणी येथील मातोश्री गि.दे. पाटील विद्यालयाचे उपशिक्षक बाळासाहेब दादा सोनवणे यांचा वाढदिवस आध्यात्मिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांच्या शुभेच्छा, सन्मान व आशीर्वादाने उत्साहात साजरा करण्यात आला. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या नाशिक जिल्हा मुख्य सेवा केंद्रात वरिष्ठ राजयोग शिक्षिका राजयोगिनी बीके पूनम दीदी यांच्या शुभहस्ते ईश्वरीय तिलक, शाल, शिवबाबा व ब्रह्माबाबांची प्रतिमा, पुष्पगुच्छ आणि ईश्वरीय सौगात देऊन सोनवणेसर यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले. राजयोगिनी ब्रह्माकुमारी वासंती दीदी यांनीही त्यांना शुभेच्छा व आशीर्वाद दिले.



याप्रसंगी बीके.इंजि.मोहन राऊत सर, बीके. साहेबरावभाई, बीके. संतोष भदाणे,इंजि. राम नेरपगार, प्रा.कुमारभाई यांच्यासह अनेक साधक उपस्थित होते. ब्रह्माकुमारी पूनम दीदी यांनी सोनवणे सर यांच्या जीवनात ईश्वरीय ज्ञान, राजयोग आणि सेवाभावातून सकारात्मकता वृद्धिंगत होवो व दिव्यांग बांधवांच्या उन्नतीसाठी त्यांच्या हातून अधिकाधिक कार्य घडो, अशा सदिच्छा व्यक्त केल्या.

तसेच कुंभमेळा राष्ट्रीय प्रवक्ते परमपूज्य महंत डॉ.भक्तीचरणदास महाराज यांच्याहस्ते सोनवणेसर यांचा वाढदिवसानिमित्त सन्मान करून शुभेच्छा व आशीर्वाद देण्यात आले.याप्रसंगी छावा भारत क्रांती मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. विलास पांगारकर,नरहरी उगलमुगले, नितीन ओसवाल, नरेंद्र महाराज संस्थानचे माजी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब विधाते आणि पत्रकार अमोल सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.महंत डॉ. भक्तीचरणदास महाराज यांनी सोनवणे सर यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि समाजसेवेसाठी अधिक बळ लाभो, अशा सदिच्छा व्यक्त केल्या. डॉ. विलास पांगारकर यांनी दिव्यांग कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सोनवणे सर करीत असलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. हितचिंतकांनी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधून तसेच प्रत्यक्ष भेटून शुभेच्छांचा वर्षाव केला.

Truhome FINANCE

टूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

मुख्य कार्यालय: लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१; **दूरध्वनीः** १८०० १०२ ४३४५, **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in

नोंदणीकृत कार्यालय: श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;

परिशिष्ट-४-ए [नियम ८(६) ची तरतूद पहा] **स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ च्या नियम ८ (६) तरतुदीअनव्ये स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई - लिलाव विक्री सूचना.

सर्व सामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार, तारणकर्ता / कर्ते आणि जामीनदारांना येथे सूचना देण्यात येत आहे कि, टूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)कडे तारण /अधिभारीत असलेल्या खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा **टूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)** सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे आणि खाली तक्त्यात दिलेल्या तपशिलानुसार लिलावाच्या आधारावर **'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जसे जेथे आहे ' या तत्वावर दि १८, २८.११.२०२६रोजी स.११ ते दु १२.०० या वेळेत विक्री केली जाईल.** कर्जदार/जामीनदार / तारणकर्ता , देय रक्कम , स्थावर मालमत्तेचे लघु वर्णन राखीव किंमत आणि बयाणा रक्कम ठेव आणि तपासणीची तारीख देखील खालीलप्रमाणे दिली आहे: :

कर्जदार/सहकर्जदार/ जमानतदार/ तारण ठेवण्याऱ्यांचे नाव	मागणी सूचनेची आणि वसुलीची रक्कम तारीख	राखीव किंमत (रु.) आणि वाढीव बोली	लिलावाची तारीख व वेळ	संपर्क व्यक्ती तपशील – (एओ व निवारण समूह)
कर्ज खाते क्रमांक : SHLHNASK0001066 **१. श्री. शिव पाल कुमावत (कर्जदार)** **२. सौ. बिमला कुमावत (सह-कर्जदार)** **सध्याचा पत्ता:वैभव हाऊसिंग सोसायटी, प्रगती कॉलनी, रामदास स्वामी मंदिरा जवळ, उपनगर, नाशिक, महाराष्ट्र - ४२२००६.** **इतर पत्ता (मालमत्तेचा पत्ता):दुसरा मजला, श्री बालाजी पार्क, सर्व्हे नं. २३७/५, प्लॉट क्र. ३, फ्लॅट क्र. २०४, सी.टी.एस. नं. ५५३३, पाथर्डी फाटा, मौजे पाथर्डी २ - पाथर्डी, नाशिक - ४२२०१०.** **एनपीए (NPA) तारीख: ०६/०५/२०२६** **ताबा दिनांक व ताबा प्रकार** **११ सप्टेंबर, २०२६, प्रत्यक्ष ताबा** **ज्ञात अधिभार** ज्ञात नाही	मागणी नोटीस तारीख: १२/०५/२०२६ कर्ज खाते क्र SHLHNASK0001066 च्या संदर्भाधीन दिनांक ११-०५-२०२६ रोजी रु. २८,५९,०६०/- (अक्षरी रुपये अठ्ठावीस लाख एकोणसाठ हजार साठ फक्त). सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत करारातील दरानुसार पुढील व्याजासह.	रु. २२,७५,०००/- (अक्षरी रुपये बावीस लाख पंचाहत्तर हजार फक्त) **बोली वाढविणे :** रु. १०,०००./- आणि त्यापटीने **बयाणा ठेव रक्कम (ईएमडी) (रुपयात)** रु. २,२७,५००/- (अक्षरी रुपये दोन लाख सत्तावीस हजार पाचशे फक्त) **ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख : १७ नोव्हेंबर, २०२६** **वेळ: सकाळी १०.०० ते दुपारी ०५.००**	**१८ नोव्हेंबर, २०२६** **वेळ. सकाळी ११.०० ते दुपारी १२.००**	**देवज्योति रॉय: ९८७४७०२०२१** **संगीत तहसीलदार: ८८८८८९५१३२** **कुंदन गुंडारे: ९८२३४०२११७** **मालमत्ता तपासणी दिनांक : २१.११.२०२६ वेळ : दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत.**

संपत्तीचे विवरण

सर्व भाग आणि तुकडा असणारा मालमत्तेचा भूखंड, ज्यामध्ये फ्लॅट क्र. २०४, ज्याचे कार्पेट क्षेत्र ५५०.९२ चौ. फूट (म्हणजेच ५१.२० चौ. मीटर) + उघड्या बाल्कनीचे क्षेत्र १२३.२० चौ. फूट (म्हणजेच ११.४५ चौ. मीटर), दुसरा मजला, "श्री बालाजी पार्क" या योजनेअंतर्गत सर्व्हे क्र. २३७/४ आणि २३७/५ मधील प्लॉट क्र. ३ (एकूण क्षेत्र ५६०.५६ चौ. मीटर) वर बांधलेला आहे. ज्याचा सी.टी.एस. (सिटी सर्व्हे) क्र. ५५३३ असून, सदर मालमत्ता मौजे पाथर्डी, तालुका व जिल्हा नाशिक येथे नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीत स्थित आहे.सीमा :पूर्व: बाजूची मोकळी जागा पश्चिम: पॅसेज, डक्ट आणि फ्लॅट क्र. २०३ दक्षिण: लिफ्ट आणि फ्लॅट क्र. २०५उत्तर: बाजूची मोकळी जागा आणि रस्ता

कर्जदार/सहकर्जदार/ जमानतदार/ तारण ठेवण्याऱ्यांचे नाव	मागणी सूचनेची आणि वसुलीची रक्कम तारीख	राखीव किंमत (रु.) आणि वाढीव बोली	लिलावाची तारीख व वेळ	संपर्क व्यक्ती तपशील – (एओ व निवारण समूह)
कर्ज खाते क्रमांक (LAN): THLHNASK0001479 **१. श्री. आकाश दीपक कथावते (कर्जदार)** **२. सौ. पुष्पा दीपक कथावते (सह-कर्जदार)** **सध्याचा पत्ता:२५, बॅकवर्ड क्लास सोसायटी, साठी आसरा मंदिराच्या मागे, शिवाजी चौक, कथाडा, नाशिक, महाराष्ट्र - ४२२००१.** **इतर पत्ता (मालमत्तेचा पत्ता):दुसरा मजला, बी विंग, 'अक्षर निसर्ग', फ्लॅट क्र. २०२, सर्व्हे नं. ३९६/३, भगवान बाबा नगर, मौजे मखमलाबाद २, नाशिक, महाराष्ट्र - ४२२००४. एनपीए (NPA) तारीख: ०३/१०/२०२६** **ताबा दिनांक व ताबा प्रकार** **१५ ऑक्टोबर, २०२६ आणि सांकेतिक ताबा** **ज्ञात अधिभार** ज्ञात नाही	मागणी नोटीस तारीख: १३/०८/२०२६ कर्ज खाते क्रमांक THLHNASK0001479 च्या संदर्भाधीन दिनांक ११-०८-२०२६ रोजी रु. १८,१८,७१९/- (अक्षरी रुपये अठरा लाख अठरा हजार सातशे एकोणीस फक्त). सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत करारातील दरानुसार पुढील व्याजासह.	रु. २३,२१,४००/-(अक्षरी रुपये तेवीस लाख एकोणीस हजार चारशे फक्त) **बोली वाढविणे :** रु. १०,०००./- आणि त्यापटीने **बयाणा ठेव रक्कम (ईएमडी) (रुपयात)** रु. २,३२,१४०/-(अक्षरी रुपये दोन लाख बत्तीस हजार एकशे चाळीस फक्त) **ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख : २७ नोव्हेंबर, २०२६** **वेळ: सकाळी १०.०० ते दुपारी ०५.००**	**२८ नोव्हेंबर, २०२६** **वेळ. सकाळी ११.०० ते दुपारी १२.००**	**देवज्योति रॉय: ९८७४७०२०२१** **संगीत तहसीलदार: ८८८८८९५१३२** **कुंदन गुंडारे: ९८२३४०२११७** **मालमत्ता तपासणी दिनांक : २१.११.२०२६ वेळ : दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत.**

संपत्तीचे विवरण

सर्व भाग आणि तुकडा असणारा मालमत्तेचा भूखंड, ज्यामध्ये फ्लॅट क्र. २०२, दुसरा मजला, "बी विंग", कार्पेट क्षेत्र ३६.७१ चौ. मीटर, उघड्या बाल्कनीचे वापरण्यायोग्य क्षेत्र ४.२० चौ. मीटर आणि संलग्न (एनक्लोज्ड) बाल्कनीचे क्षेत्र २.८४ चौ. मीटर, "अक्षर निसर्ग" (बी विंग) या योजनेअंतर्गत एकूण जमिनीचे (प्लॉट) क्षेत्र ११००.०० चौ. मीटर असणाऱ्या सर्व्हे/गट क्र. ३९६/३ वर बांधलेला आहे. सदर मालमत्ता मौजे मखमलाबाद-२, तालुका नाशिक, जिल्हा नाशिक येथे नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीत स्थित आहे - ४२२००३. खरेदीखत अहवालानुसार चार सीमा :पूर्व: डक्ट आणि फ्लॅट क्र. २०१ पश्चिम: बाजूची मोकळी जागा उत्तर: फ्लॅट क्र. बी-२०३ दक्षिण: मोकळी जागा आणि 'ए' विंग

०१. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, टूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) च्या वेबसाइटला देखील भेट देऊ शकता.
०२. इच्छुक बोलीदारांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस / एनईएफटी स्वरूपात बँकेचे नाव- ॲक्सिस बँक लिमिटेड शाखा: वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई बँक खाते क्रमांक-चालू खाते क्रमांक ९११०२००४५६७७६३३ आयएफएससी कोड- यूटीआयबी ००००२३० येथे जमा करावी:

ठिकाण - नाशिक
दिनांक : २२-१०-२०२६

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
टूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)